THE

# Bombay Government Gazette.

**Published by Authority.**

THURSDAY, 27TH FEBRUARY 1896.

*Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल ह्यांचा खालीं लिहिलेला आक्ट आली जनाब गव्हर्नर जनरल ह्यांनीं तारीख ४ माहे अक्टोबर सन १८९५ रोजीं मंजूर केला, तो सर्व लोकांस जाहीर होण्यासाठीं प्रसिद्ध केला असेः—

### सन १८९५ चा आक्ट १४.

सन १८९५ चा हाजी नेणाऱ्या तारवांबाबद आक्ट.

अनुक्रमणिका.

कलमें.

प्रथमारंभींचे ठराव.

१. सरनामा.
२. कोठें व कोणकोणाला लागू आहे तें.
३. सुरुवात.
४. सन १८८७ चा आक्ट १० याचा हाजी नेणाऱ्या तारवांशीं संबंध असेल तेथवर तो रद्द केला असे.
५. व्याख्या.

हाजी नेणाऱ्या तारवांच्या सफरींबाबद नियम.

६. हाजी नेणाऱ्या तारवांवरील सर्व उतारूंस हाजींदाखल मानणें.
७. सरकारानें नेमलेल्या जागांपासून मात्र हाजी नेणारीं तारवें हकारणें.
८. हकारण्याच्या वेळाची सूचना देणें.
९. हाजी नेणाऱ्या तारवावर जाऊन त्याची पाहणी करण्याचा अधिकार.
१०. दोन दाखले असल्यावांचून हाजी नेणारें तारूं हकारूं नये.

कलमें.

११. दाखला अ यांतील मजकूर.
१२. दाखला ब यांतील मजकूर.
१३. दाखले देणें.
१४. दाखला अ याच्याबद्दल दुसरा.
१५. हाजी नेणाऱ्या तारवाची तपासणी.
१६. नजरेस येईल त्याप्रमाणें दाखला देणें.
१७. दाखल्यांची नकल प्रदर्शित करणें.
१८. हाजींनीं आपलें स्वतःचें खुराकी सामान घेतलें असलें तर.
१९. हाजींकरितां जागेची तजवीज करणें.
२०. हाजींच्या सामानाची व्यवस्था.
२१. इसपितळाची सोई.
२२. हाजींबाबदचें पत्रक तारूं निघण्यापूर्वीं देणें.
२३. सफरींत घडलेल्या मृत्यूंबाबद.
२४. हाजी नेणाऱ्या तारवानें दर्र्यांनच्या जागीं जास्त हाजी घेतले तर.
२५. हाजींबाबदचें पत्रक ब्रिटिश हिंदुस्थानांत हाजी तारवावरून उतरण्यापूर्वीं देणें.

२६. हाजी नेणारीं तारवें मुख्यत्वेंकरून वाफेच्या योगानें चालविणें व तीं अमुक बारदानाचीं व वाफेच्या शक्तीचीं असणें.

२७. हाजी नेणाऱ्या कित्येक तारवांवर वैद्यकीय अमलदार व तैनातीचीं मनुष्यें असणें.

२८. वैद्यकीय अमलदारांचे रोजनामे व रिपोर्ट.

२९. हाजी नेणाऱ्या तारवांनीं जात्यां सफरींत आदनास लागणें.

३०. आदन येथील अधिकाऱ्यास तारवाला बंदर सोडण्याची परवानगी देण्यास इनकार करण्याचा केव्हां अखत्यार आहे.

३१. हाजी नेणारें तारूं जात्या सफरीवर जाईल त्या प्रसंगीं खत लिहून देणें.

३२. हाजी तारवावर चढण्यापूर्वी वैद्यकीय पाहणीची व परवानगीची जरूरी आहे.

३३. कित्येक प्रसंगीं हाजी तारवावर चढल्यानंतर वैद्यकीय पाहणी करणें.

३४. स्त्रियांची वैद्यकीय पाहणी.

३५. तिकिटें देणें व हजर करणें आणि नोर परत देणें.

३६. आरोग्यरक्षणासंबंधीं कर हाजी नेणाऱ्या तारवाच्या मास्तरानें देणें.

**शिक्षा.**

३७. हाजी नेणारें तारूं गैरकायदेशीर रीतीनें निघण्याबद्दल किंवा त्यानें त्याप्रमाणें हाजी घेण्याबद्दल मास्तरास किंवा मालकास शिक्षा.

३८. हाजी नेणाऱ्या तारवावर जाण्यास किंवा त्याची पाहणी करण्यास हरकत करण्याबद्दल शिक्षा.

३९. दाखल्यांची नकल प्रदर्शित न करण्याबद्दल मास्तरास किंवा मालकास शिक्षा.

४०. हाजींसंबंधीं पत्रकांबाबद फर्मावित्याप्रमाणें न करण्याबद्दल व दुसऱ्या कित्येक गोष्टींबद्दल मास्तरास शिक्षा.

४१. दाखला घेतल्यावर हाजी नेणाऱ्या तारवांत कपटानें फेरफार करण्याबद्दल मास्तरास शिक्षा.

४२. ठरविलेलें खुराकी सामान हाजींस देण्यास चुकण्याबद्दल मास्तरास शिक्षा.

४३. ज्या संख्येपर्यंत हाजी नेण्याचा अधिकार असेल तिच्याहून जास्त हाजी नेण्याबद्दल मास्तरास व मालकास शिक्षा.

४४. हाजीनें ज्या जागीं उतरण्याचा करार केला असेल त्याखेरीज इतर जागीं त्यास उतरण्याबद्दल मास्तरास शिक्षा.

४५. हाजींबरोबर केलेल्या कराराविरुद्ध सफर करण्याबद्दल मास्तरास व मालकास शिक्षा.

४६. हाजी नेणारें तारूं मुख्यत्वेंकरून वाफेच्या योगानें न चालविण्याबद्दल किंवा तें ठरविलेल्या बारदानाचें किंवा वाफेच्या शक्तीचें नसण्याबद्दल त्याच्या मास्तरास व मालकास शिक्षा.

४७. एका किंवा अधिक वैद्यकीय अमलदारांवाचून किंवा तैनातीच्या मनुष्यांवांचून २७ व्या कलमाविरुद्ध हाजी नेणारें तारूं हकारण्याबद्दल त्याच्या मास्तरास शिक्षा.

४८. जात्या सफरींत आदन येथें दाखला न घेण्याबद्दल मास्तरास शिक्षा.

४९. कलम ३२ किंवा ३३ या विरुद्ध हाजी किंवा जिन्नस तारवावर घेणाऱ्या किंवा ठेवणाऱ्या मास्तरास शिक्षा.

५०. हाजी नेणाऱ्या तारवाचा मास्तर किंवा वैद्यकीय अमलदार यास या आक्टाअन्वयें केलेल्या कानू न पाळण्याबद्दल शिक्षा.

**काम चालविण्याची रीत.**

५१. अपराध ठरविणें, व हाजी नेणारें तारूं जप्त करून दंड वसूल करणें.

५२. अधिकार.

५३. शिक्षा होण्याबद्दल काम चालविण्याला आधार.

५४. दंडांचा विनियोग.

५५. गैरहजर साक्षीदारांच्या जबान्या.

**पुरवणी ठराव.**

५६. हाजी तारवावर चढल्याच्या व ते तारवावरून उतरण्याच्या बंदरांस माहिती पाठविणें.

५७. कान्सलचा रिपोर्ट.

५८. गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल व स्थानिक सरकार यांस कानू करण्याचा अधिकार.

५९. हल्लीं असणाऱ्या कानू तूर्त चालू राहणें.

६०. अमलदारांची नेमणूक.

## हाजी नेणाऱ्या तारवांच्या नियमनाकरितां विशेष चांगला बंदोबस्त करण्याबाबद्चा आक्ट.

---

ज्याअर्थी हाजी नेणाऱ्या तारवांच्या नियमनाकरितां विशेष चांगला बंदोबस्त करणें योग्य आहे, त्याअर्थीं यावरून पुढीलप्रमाणें ठरविण्यांत येत आहे:—

### प्रथमारंभींचे ठराव.

१. ह्या आक्टास, सन १८९५ चा हाजी नेणाऱ्या तारवांबाबद आक्ट, असें ह्मणावें. सरनामा.

२. (१) तो सगळ्या ब्रिटिश हिंदुस्थानास, आणि— कोठें व कोणकोणाला लागू आहे तें.

(अ) मलिका माआझमांची जी रयत, मलिका माआझमांच्या सार्वभौम सत्तेखालीं असणाऱ्या हिंदुस्थानांतील राजांच्या व संस्थानांच्या राज्यांत असेल त्या सर्व रयतेस;

(ब) मलिका माआझमांची जी हिंदुस्थानांतील देशी रयत ब्रिटिश हिंदुस्थानाच्या बाहेर व पलीकडे असेल त्या सर्व रयतेस; आणि

(क) यांत पुढें हाजी नेणाऱ्या तारवाची व्याख्या केली आहे तशा दरेक तारवास, पोट-कलम (२) यांत सांगितलेल्या अपवादांस अनुसरून,

लागू आहे.

(२) परंतु तो—

(१) बादशाही आरमाराच्या किंवा बादशाही इंडियन मरीन सर्व्हिसच्या कोणत्याही लढाऊ तारवास, ट्रूपशिपास [लष्कर नेणाऱ्या तारवास], ट्रान्स्पोर्टास [मनुष्यें व सामानसरंजाम नेणाऱ्या तारवास] किंवा दुसऱ्या तारवास, किंवा

(२) मलिका माआझमांच्या नौकरींत त्या त्या वेळीं असणाऱ्या दुसऱ्या कोणत्याही तारवास, किंवा

(३) कोणत्याही परराजाच्या किंवा परसंस्थानाच्या कोणत्याही लढाऊ तारवास, किंवा

(४) हाजी नेणारें तारूं नसणाऱ्या कोणत्याही तारवास,

नाहीं.

सुरुवात.

३. हा आक्ट, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल हे, इंडिया गॅझेटांत जाहिरनामा प्रसिद्ध करून, तो अमलांत येण्याबाबद जी तारीख नेमतील त्या तारखेस अमलांत येईल.

सन १८८७ चा आक्ट १० याचा हाजी नेणाऱ्या तारवांशीं संबंध असेल तेथवर तो रद्द केला असे.

४. सदरहू तारखेस व त्या तारखेपासून, सन १८८७ चा देशी उतारू नेणाऱ्या तारवांबाबद आक्ट यांतील कोणताही मजकूर हाजी नेणाऱ्या कोणत्याही तारवास लागू होणार नाहीं.

व्याख्या.

५. या आक्टांत, विषयास किंवा संदर्भास बाध येत नसेल तर,—

(१) "हाजी" या शब्दाचा अर्थ, हेजाझला जाणारा किंवा तेथून परत येणारा मुसलमान उतारू, असा समजावाः परंतु त्यांत एका वर्षाच्या वयाखालील मुलाचा समावेश होत नाहीं, आणि या आक्टाच्या सर्व किंवा कोणत्याही कारणाकरितां हाजींची गणती करतांना, एका वर्षाच्या वयाचीं किंवा त्याहून जास्त वयाचीं व बारा वर्षांच्या वयाखालचीं दोन मनुष्यें एका हाजीदाखल गणावीं असें, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांस, इंडिया गॅझेटांत जाहिरनामा प्रसिद्ध करून, फर्माविण्याचा अधिकार आहे.

खुलासा.—जो मुसलमान उतारू हेजाझला जाण्याच्या इरादानें तारवावर चढला असेल, परंतु तेथें खरोखर न उतरतां परत येत असेल, तो या आक्टाच्या कारणांकरितां हाजी आहे असें मानलें पाहिजेः

(२) "हाजी नेणारें तारूं" या संज्ञेचा अर्थ, ब्रिटिश हिंदुस्थानांतील कोणत्याही बंदरापासून तांबड्या समुद्रामधील सुएज खेरीज करून इतर कोणत्याही बंदरास किंवा तांबड्या समुद्रांतील सुएझ खेरीज करून इतर कोणत्याही बंदरापासून ब्रिटिश हिंदुस्थानांतील कोणत्याही बंदरास हाजी नेत किंवा आणीत आहे किंवा नेण्याआणण्याच्या बेतांत आहे असें तारूं, असा समजावाः

मात्र असें ठरविण्यांत येतें कीं, जें तारूं अगदीं खालच्या वर्गाच्या हाजींखेरीज इतर उतारू नेत असून ज्यावर त्याच्या एकंदर बारदानापैकीं दर शंभर टनांस एका हाजीहून कमी प्रमाणानें अगदीं खालच्या वर्गाचे हाजी असतील, तसें कोणतेंही तारूं या आक्टाच्या अर्थाप्रमाणें हाजी नेणारें तारूं आहे असें समजूं नयेः

खुलासा.—"अगदीं खालच्या वर्गाचा हाजी" ह्मणजे ज्याकरितां कोणत्याही केबिनमध्यें, स्टेटरूममध्यें किंवा सलूनमध्यें निराळी जागा राखून ठेविलेली नाहीं असा हाजी समजावाः

(३) "सफर" या शब्दाचा अर्थ, हाजी नेणाऱ्या तारवाचें निघण्याचें बंदर किंवा जागा व त्याचें अखेर पोहंचण्याचें बंदर किंवा जागा यांच्या दर्म्यानचें सगळें अंतर, असा समजावा :

(४) "कस्टमचा मुख्य अमलदार" या संज्ञेचा अर्थ, ज्या बंदरास किंवा जागेस हा आक्ट लागू आहे तशा कोणत्याही बंदराचा किंवा जागेचा, जलमार्गाच्या कस्टमचा कारभार चालविणारा मुख्य अमलदार, असा समजावा :

(५) "माजिस्ट्रेट" या शब्दाचा अर्थ, जो मनुष्य दुसऱ्या वर्गाच्या माजिस्ट्रेटाच्या अधिकारांहून कमी दर्जाचे नसणारे अधिकार चालवीत असेल तसा मनुष्य, असा समजावा : आणि

(६) "ठरविलेलें" ह्मणजे या आक्टाअन्वयें गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांनीं केलेल्या कानूंमध्यें ठरविलेलें, असें समजावें.

## हाजी नेणाऱ्या तारवांच्या सफरींबाबद नियम.

६. हाजी नेणाऱ्या तारवावरील प्रत्येक उतारू हा, या आक्टाच्या कारणांकरितां हाजीदाखल मानला पाहिजे, मग तो हाजी असो किंवा नसो.

हाजी नेणाऱ्या तारवांवरील सर्व उतारूंस हाजीदाखल मानणें.

७. (१) हाजी नेणाऱ्या कोणत्याही तारवानें निघण्यासाठीं किंवा जाण्यासाठीं किंवा हाजी उतरण्यासाठीं स्थानिक सरकार ब्रिटिश हिंदुस्थानांत जें बंदर किंवा जी जागा नेमील त्याखेरीज इतर कोणत्याही बंदराहून किंवा जागेहून त्या तारवानें निघतां किंवा जातां कामा नये, किंवा इतर कोणत्याहि बंदरीं किंवा जागीं हाजी उतरतां कामा नये.

सरकारानें नेमलेल्या जागांपासून मात्र हाजी नेणारीं तारवें हकारणें.

(२) सदरहूप्रमाणें नेमलेल्या बंदराहून किंवा जागेहून हाजी नेणारें तारूं सफरीवर निघाल्यानंतर किंवा गेल्यानंतर, त्या तारवावर कोणत्याही मनुष्यास, सदरहूप्रमाणें नेमलेल्या इतर कोणत्या तरी बंदराखेरीज किंवा जागेखेरीज हाजीदाखल घेतां कामा नये.

८. (१) हाजी नेणारें तारूं सदरहूप्रमाणें निघेल किंवा जाईल त्याच्या मास्तरानें, मालकानें किंवा एजंटानें, त्यांतून हाजी जावयाचे असल्याबदल आणि त्याची अखेर जाण्याची जागा व हकारण्याची योजलेली वेळ यांबद्दल, स्थानिक सरकारानें त्याबाबद नेमलेल्या अमलदारास सूचना दिली पाहिजे.

हकारण्याच्या वेळाची सूचना देणें.

(२) सदरहू सूचना सदरहू वेळापूर्वी, निघण्याचें अवल बंदर ब्रिटिश हिंदुस्थानांत असल्यास तेथें, व इतर प्रसंगीं, तें तारूं ब्रिटिश हिंदुस्थानांत प्रथम ज्या बंदरीं लागेल तेथें, निदान तीन दिवस अगोदर, आणि ज्या ज्या इतर बंदरीं तें लागेल त्या सर्व बंदरीं निदान चोवीस तास अगोदर दिली पाहिजे.

९. सदरहू सूचना पोहंचल्यावर सदरहू अमलदारास किंवा त्यानें अखत्यार दिलेल्या मनुष्यास, त्या तारवावर जाण्याची, आणि तें तारूं व त्यावरील सोई [फिटिंग्स] आणि खुराकी सामान व सामग्री यांची पहाणी करण्याची कोणत्याही वेळीं मोकळीक आहे.

हाजी नेणाऱ्या तारवावर जाऊन त्याची पाहणी करण्याचा अधिकार.

१०. (१) हाजी नेणाऱ्या कोणत्याही तारवानें, पुढील लगतच्या दोन कलमांत सांगितलेल्या मजकुराचे दोन दाखले त्याच्या मास्तराजवळ असल्यावांचून, या आक्टाअन्वयें नेमलेल्या बंदराहून किंवा जागेहून सफर सुरू करतां कामा नये.

दोन दाखले असल्यावांचून हाजी नेणारें तारूं हकारूं नये.

(२) पोर्ट-क्लियरन्स देण्याचें ज्या अमलदाराचें काम असेल त्यानें तें मास्तराजवळ सदरहू दाखले असल्यावांचून देतां कामा नये.

११. सदरहू दाखल्यांपैकीं पहिला (ज्यास या आक्टांत पुढें "दाखला अ" असें ह्मटलें आहे) यांत, तारूं जौळी असून त्यावर योग्य सरंजाम, सोई व वारा खेळण्याचं साधन हीं आहेत असा मजकूर, व तें दरेक वर्गाचे जितके हाजी नेऊं शकेल त्यांची संख्या हीं लिहिलेलीं असलीं पाहिजेत.

दाखला अ यांतील मजकूर.

१२. सदरहू दाखल्यांपैकीं दुसरा (ज्यास या आक्टांत पुढें "दाखला ब" असें ह्मटलें आहे) यांत पुढील मजकूर लिहिलेला असला पाहिजे, ह्मणजे—

दाखला ब यांतील मजकूर.

(अ) तारूं जी सफर करणार असेल ती, आणि दर्म्यानच्या कोणत्याही बंदरांस तें लागण्याचें असल्यास तीं बंदरें;

(ब) त्यावर असावे तितके अमलदार व खलाशी आहेत;

(क) तारवाच्या नोकर लोकांकरितां जरूर आहे त्याहून जास्त खुराकी सामान, सर्पण व स्वच्छ पाणी, आणि हाजी नेणाऱ्या तारवांसाठीं इतर कांहीं वस्तु ठरविलेल्या असल्यास त्या, हीं तारवावर घेतलेलीं आहेत, आणि तीं ठरविलेल्या प्रतीचीं असून योग्य रीतीनें बंद [प्याक] केलेलीं आहेत, आणि अशा तारवास जी सफर करणें आहे, तिच्या मुदतींत (क्वारंटी-नमध्यें कांहीं खोळंबा होण्याचा अजमास दिसत असल्यास तो धरून) तारवावरील हाजींस, जें मान त्या त्या वेळीं ठरविलेलें असेल त्या मानाप्रमाणें, पुरण्यापुरतीं आहेत;

(ड) मास्तराजवळ दाखला अ हा आहे;

(इ) तारूं मुख्यत्वेंकरून वाफेच्या योगानें चालविलेलें आहे;

(फ) ठरविलेल्या (असल्यास) बारदानाचें व वाफेच्या शक्तीचें तें आहे;

(ग) जर तें तारूं शंभरांहून जास्त हाजी नेणार असेल तर त्यावर, २७ व्या कलमावरून जरूर असल्याप्रमाणें, एक किंवा अधिक वैद्यकीय अमलदार व ठरविलेली तैनातीचीं मनुष्यें घेतलीं आहेत;

(ह) इतर कांहीं तपशील ठरविलेला असल्यास तो.

दाखले देणें.

१३. दाखला अ व दाखला ब हे द्यावयाचे ते, ८ व्या कलमाअन्वयें नेमलेल्या अमलदारानें दिले पाहिजेत.

दाखला अ याच्याबद्दल दुसरा.

१४. ज्या प्रसंगीं हाजी नेणाऱ्या तारवाचा मास्तर सदरहू अमलदाराकडे, खालीं लिहिलेल्या दाखल्यांपैकीं कोणताही एक, ह्मणजे,—

(अ) बोर्ड आफ् ट्रेड यानें किंवा एकाद्या ब्रिटिश कालनीच्या सरकारानें दिलेला व्यवहारोपयोगी दाखला, किंवा

(ब) तारूं हकारण्याचा जो दिवस योजला असेल त्या दिवसापूर्वीच्या एका वर्षाच्या आंतील तारखेस ब्रिटिश हिंदुस्थानच्या एकाद्या सरकारानें दिलेल्या अधिकाराअन्वयें दिलेला, अमलांत असणारा आणि ज्या सफरीवर तारूं जावयाचें असेल त्या सफरीस किंवा ज्या कामावर तें लावलें जाण्याच्या बेतांत असेल त्या कामास लागू असणारा दाखला,

हा हजर करील, त्या प्रसंगीं ११ व्या कलमावरून जरूर असणारा तपशील त्या दाखल्यांत लिहिलेला असला तर, तो दाखला सदरहू प्रकारच्या तपशिलाच्या पुराव्याप्रमाणें मानण्याचा सदरहू अमलदारास अधिकार आहे, आणि तो मग या आक्टाच्या कारणांसाठीं दाखला अ असल्याप्रमाणें मानला पाहिजे.

हाजी नेणाऱ्या तारवाची तपासणी.

१५. (१) कलम ८ यावरून जरूर असणारी सूचना पोहंचल्यावर, त्या कलमाअन्वयें नेमलेल्या अमलदारास, त्याला योग्य वाटेल तर, लायक सर्व्हेयरांकडून मास्तराच्या किंवा मालकाच्या खर्चानें तारवाची तपासणी करविण्याचा अधिकार आहे, आणि या सर्व्हेयरांनीं, आपल्या मतें, तें तारूं हाजी नेण्याच्या कारणासाठीं जौळी आहे किंवा कसें आणि त्यावर योग्य सरंजाम, सोई व वारा खेळण्याचें साधन हीं आहेत किंवा कसें याविषयीं त्या अमलदारास रिपोर्ट केला पाहिजे:

मात्र असें ठरविण्यांत येतें कीं, हाजी नेणाऱ्या ज्या तारवापाशीं १४ व्या कलमाच्या (अ) रकमेंत किंवा (ब) रकमेंत सांगितलेला दाखला असेल त्याची तपासणी त्यानें, तें

तारूं जायां झाल्याच्या किंवा त्यांत फेरबदल झाल्याच्या कारणानें किंवा इतर कोणत्याही वाजवी सबबीमुळें हाजी नेण्याच्या कारणासाठीं जौळी नाहीं किंवा त्यावर योग्य सरंजाम, सोई किंवा वारा खेळण्याचें साधन नाहीं असें आढळून येण्याचा संभव आहे असें त्यास वाटल्याखेरीज, करूं नये.

(२) हाजी नेणाऱ्या ज्या तारवापाशीं सदरहू प्रकारचा कोणताही दाखला असेल त्याची सदरहू अमलदार जर तपासगी करवील, आणि सर्व्हेयर जर असा रिपोर्ट करतील कीं, तें तारूं हाजी नेण्याच्या कारणासाठीं जौळी असून त्यावर योग्य सरंजाम, सोई व वारा खेळण्याचें साधन हीं आहेत, आणि तें अशा कामासाठीं जौळी नाहीं किंवा त्यावर योग्य सरंजाम, सोई किंवा वारा खेळण्याचें साधन नाहीं असें आढळून येण्याचा संभव आहे असें सदरहू अमलदारास वाटण्याची वाजवी सबब नव्हती, तर अशा तपासणीचा खर्च स्थानिक सरकारानें दिला पाहिजे.

नजरेस येईल त्याप्रमाणें दाखला देणें.

१६. (१) हाजी नेणाऱ्या तारवाबाबद या भाक्टाअन्वयें दाखला देण्याचा अधिकार ज्या अमलदारास दिला असेल त्यानें तो दाखला, तारवावर चढलेल्या हाजींच्या आरोग्यास किंवा सुरक्षितपणास बाध येण्यासारखा आहे अशा प्रतीचा, इतक्या परिमाणाचा किंवा अशा रीतीनें भरून ठेवलेला कोणताही माल तारवावर नाहीं अशी आपली खात्री झाल्यावांचून, देतां कामा नये.

(२) परंतु वर ठराव केला आहे तो खेरीज करून, व पोट-कलम (३) यांतील ठरावांस अनुसरून, या भाक्टाअन्वयें द्यावयाचा दाखला देणें न देणें हें सदरहू अमलदाराच्या नजरेवर आहे.

(३) सदरहू प्रकारची नजर सदरहू अमलदार चालवील त्या कामीं तो, स्थानिक सरकारच्या, आणि तें सरकार आपल्या व त्या अमलदाराच्या दर्म्यान जो कोणताही अधिकारी निर्बंध ठेवण्यासाठीं नेमील त्या अधिकाऱ्याच्या, निर्बंधाखालीं राहील.

दाखल्यांची नकल प्रदर्शित करणें.

१७. हाजी नेणाऱ्या दरेक तारवाच्या मास्तरानें किंवा मालकानें, अशा तारवाबाबद या भाक्टाअन्वयें दिलेल्या दाखल्यांपैकीं प्रत्येक दाखल्याची एकेक नकल, त्या तारवावरील मनुष्यांस दिसे अशा रीतीनें, त्या तारवाच्या एकाद्या प्रसिद्ध भागीं लावली पाहिजे, व ती सफरीच्या सर्व मुदतींत त्याप्रमाणें लावलेली ठेविली पाहिजे.

हाजींनीं आपलें स्वतःचें खुराकी सामान घेतलें असलें तर.

१८. ज्या प्रतीचें व जितकें खुराकी सामान ठरविलेलें असेल, त्या प्रतीचें व तितकें, हाजी नेणाऱ्या तारवावर कोणा हाजीनें आपल्या स्वतःच्या उपयोगाकरितां घेतलें आहे अशी, त्या कामासाठीं स्थानिक सरकारानें नेमलेल्या अमलदाराची खात्री होईल तर, हाजींसाठीं खुराकी सामानाचा पुरवठा करण्याबद्दलचे या भाक्टांतील ठराव, त्या हाजीसाठीं खुराकी सामानाचा पुरवठा करण्याच्या संबंधापुरते लागू होणार नाहींत.

हाजींकरितां जागेची तजवीज करणें.

१९. (१) गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांस, हाजी नेणाऱ्या तारवांमध्यें दरेक वर्गाच्या हाजींकरितां मिळण्यासारखी मधल्या डेकांवर (उतारू नेणाऱ्या तारवांच्या नियमनाबाबदच्या कोणत्याही भाक्टाअन्वयें त्या त्या वेळीं उतारूंकरितां जरूर असणाऱ्या जागेहून कमी नाहीं अशी) किती चौरस व किती घन फूट जागा असली पाहिजे तें हुकूम फर्मावून ठरविण्याचा अधिकार आहे.

(२) हाजी नेणाऱ्या दरेक तारवांत, तारवावरील नोकर लोकांच्या हवा घेण्याच्या जागेकरितां व कायमच्या इमल्यांकरितां वरच्या डेकच्या जेवढ्या भागाची जरूरी नसेल तेवढा भाग त्या तारवावरील हाजींला दिवसास व रात्रीं मोफत वापरण्याकरितां राखून ठेवलेला असला पाहिजेः

मात्र असें ठरविण्यांत येतें कीं वरच्या डेकवर हाजींकरितां मिळण्यासारखी जागा असावयाची ती, तारवावरील बारा वर्षांच्या किंवा त्याहून जास्त वयाच्या दरेक हाजीकरितां सहा चौरस फुटांहून कोणत्याही प्रसंगीं कमी असूं नये.

(३) सदरीं सांगितलें आहे त्यास व या आक्टाअन्वयें ज्या कोणत्याही कानू करण्यांत येतील त्यांस अनुसरून, अशी जागा निरनिराळ्या वर्गांच्या हाजींमध्यें योग्य वाटेल त्या प्रमाणानें वांटून देण्याचा अधिकार आहे:

मात्र असें ठरविण्यांत येतें कीं, कोणत्याही वर्गाला, त्या वर्गांतील बारा वर्षांच्या वयाच्या किंवा त्याहून जास्त वयाच्या तारवावर असणाऱ्या दरेक हाजीकरितां सहा चौरस फूट जागा मिळण्याला जितकी जागा जरूर असेल तिच्याहून कमी देतां कामा नये.

हाजींच्या सामानाची व्यवस्था.

२०. तारवावर सर्व हाजींच्या सामानाची [ब्यागेजची] व्यवस्था, जी रीत ठरविण्यांत येईल त्या रीतीनें लावली पाहिजे.

इसपितळाची सोई.

२१. हाजी नेणाऱ्या दरेक तारवावर इसपितळाची शिस्तवार रीतीनें योजना केलेली असून त्यांत, सुरक्षितपणा, आरोग्य व जागा यांबाबद ज्या शर्ती ठरविण्यांत येतील त्यांप्रमाणें व्यवस्था असली पाहिजे व तारवावर चढलेल्या हाजींपैकीं शेंकडा पांचांहून जास्त नाहीं अशा जितक्या असामींची त्या इसपितळांत सोई झाली पाहिजे ह्मणून ठरविण्यांत येईल तितक्या असामींची सोई होण्याजोगें तें असलें पाहिजे.

हाजींबाबदचें पत्रक तारूं निघण्यापूर्वी देणें.

२२. ब्रिटिश हिंदुस्थानांतील कोणत्याही बंदराहून किंवा जागेहून निघणाऱ्या किंवा जाणाऱ्या हाजी नेणाऱ्या दरेक तारवाच्या मास्तरानें, तारवावर चढलेल्या सर्व हाजींची एकंदर संख्या व त्यांपैकीं पुरुष किती व स्त्रिया किती तें व तारवाच्या नौकर लोकांची संख्या, आणि ठरविण्यांत येईल तसा इतर तपशील हीं नमूद करून ठरविलेल्या नमुन्याप्रमाणें एका पत्रकाच्या दोन प्रति तयार केल्या पाहिजेत, व त्यांवर सही करून, त्या दोन्ही प्रति कलम ८ याअन्वयें नेमलेल्या अमलदाराकडे दिल्या पाहिजेत. मग त्या अमलदारानें त्यांतील मजकूर बरोबर असल्याबद्दल प्रथम आपली खात्री करून घेतली पाहिजे, व नंतर त्यांपैकीं एका प्रतीवर मखलासी करून ती मास्तरास परत दिली पाहिजे.

सफरींत घडलेल्या मृत्यूंबाबद.

२३. हाजी नेणाऱ्या दरेक तारवाच्या मास्तरानें, आपणास सदरील शेवटच्या कलमाअन्वयें परत दिलेल्या पत्रकाच्या प्रतीवर व पुढल्या लगतच्या कलमाअन्वयें करावयाच्या कोणत्याही जादा पत्रकावर सफरींत कोणी हाजी मरण पावला असल्यास त्याच्या मरणाची तारीख व मरणाचें जें कारण वाटत असेल तें हीं लिहून ठेविलीं पाहिजेत, आणि ज्या बंदरीं किंवा जागीं असें हाजी नेणारें तारूं शेवटीं जाण्याचें असेल त्या बंदरीं किंवा जागीं किंवा ज्या कोणत्याही बंदरीं किंवा जागीं हाजी उतरण्याचें योजिलें असेल त्या बंदरीं किंवा जागीं तें पोहचेल तेव्हां, आणि कोणतेही हाजी तारवावरून उतरण्यापूर्वी, तें पत्रक, त्याला जीं कोणतींही जादापत्रकें जोडलीं असतील त्यांसुद्धा, त्यानें, त्या बंदरीं किंवा जागीं मलिका मोआज्झमांच्या वतीनें कान्सलचा अधिकार जो कोणताही मनुष्य कायदेशीर रीतीनें चालवीत असेल त्याकडे किंवा त्या ठिकाणच्या कस्टमच्या मुख्य अमलदाराकडे, किंवा तेथें ८ व्या कलमाअन्वयें अमलदार नेमलेला असल्यास, त्याकडे हजर केलें पाहिजे.

हाजी नेणाऱ्या तारवानें दरम्यानच्या जागीं जास्त हाजी घेतले तर.

२४. (१) पुढील दोन्हींतून कोणत्याही बाबतींत,

(अ) जर हाजी नेणारें तारूं आपल्या सफरीवर निघाल्यानंतर किंवा गेल्यानंतर कोणतेही जास्त हाजी, हाजी तारवावर चढविण्यासाठीं या आक्टाअन्वयें नेमलेल्या ब्रिटिश हिंदुस्थानांतील कोणत्याही बंदरीं किंवा जागीं तारवावर घेण्यांत आले तर, किंवा

(ब) जर हाजी नेणारें तारूं ब्रिटिश हिंदुस्थानापलीकडील कोणत्याही जागीं जास्त हाजी अगोदर घेऊन, आपल्या सफरींत सदरहू प्रकारच्या कोणत्याही बंदरीं किंवा जागीं लागेल किंवा येईल तर,

त्या बंदरीं किंवा जागीं ८ व्या कलमाअन्वयें नेमलेल्या अमलदाराकडून मास्तरानें दाखला ब च्या मजकुराचा एक नवीन दाखला घेतला पाहिजे, आणि ठरविलेल्या नमुन्याप्रमाणें अशा जादा हाजीसंबंधीं एका जादा पत्रकाच्या दोन प्रति तयार करून दिल्या पाहिजेत.

(२) दाखला ब व हाजी नेणाऱ्या तारवांच्या मास्तरांनीं सही करून द्यावयाचें हाजीसंबंधी पत्रक यांबाबदचे या आक्टांत मागें जे ठराव सांगितले आहेत ते सर्व या कलमाअन्वयें दिलेल्या कोणत्याही दाखल्यास किंवा करून दिलेल्या कोणत्याही पत्रकास लागू होतील.

हाजींबाबदचें पत्रक ब्रिटिश हिंदुस्थानांत हाजी तारवावरून उतरण्यापूर्वी देणें.

२५. ब्रिटिश हिंदुस्थानांतील ज्या कोणत्याही बंदरीं किंवा जागीं हाजी तारवावरून उतरण्याचें योजिलें असेल त्या बंदरीं किंवा जागीं येणाऱ्या हाजी नेणाऱ्या दरेक तारवाच्या मास्तरानें, तारवावरील सर्व हाजींची एकंदर संख्या आणि त्यांपैकीं पुरुष किती व स्त्रिया किती तें व तारवाच्या नोकरलोकांची संख्या, आणि ठरविण्यांत येईल तसा इतर तपशील हीं नमुद केलेलें आपल्या सहीचें एक पत्रक, कोणतेही हाजी तारवावरून उतरण्यापूर्वीं, ८व्या कलमाअन्वयें त्या ठिकाणीं नेमलेल्या अमलदाराकडे दिलें पाहिजे.

हाजी नेणारीं तारवें मुख्यत्वेंकरून वाफेच्या योगानें चालविणें व तीं अमुक बारदानाचीं व वाफेच्या शक्तीचीं असणें.

२६. हाजी नेणारें दरेक तारूं मुख्यत्वेंकरून वाफेच्या योगानें चालविलें पाहिजे, आणि तें ठरविलेल्या ( असल्यास ) बारदानाचें व वाफेच्या शक्तीचें असलें पाहिजे.

हाजी नेणाऱ्या कित्येक तारवांवर वैद्यकीय अमलदार व तैनातीचीं मनुष्यें असणें.

२७. शंभरांहून जास्त हाजी नेणाऱ्या दरेक तारवावर, ठरविलेल्या रीतीनें लैसेन्स मिळालेला एक वैद्यकीय अमलदार असला पाहिजे, आणि नेलेल्या हाजींची संख्या एक हजाराहून जास्त असेल, तर सदरीलप्रमाणें लैसेन्स मिळालेला दुसरा एक वैद्यकीय अमलदार असला पाहिजे, आणि ठरविलीं असतील तशीं तैनातीचीं मनुष्येंही सर्व बाबतींत असलीं पाहिजेत.

वैद्यकीय अमलदारांचे रोजनामे व रिपोर्ट.

२८. हाजी नेणाऱ्या दरेक तारवाच्या वैद्यकीय अमलदारानें किंवा वैद्यकीय अमलदारांनीं ठरविण्यांत येतील तसे रोजनामे ठेविले पाहिजेत आणि तसे रिपोर्ट किंवा इतर तक्ते सादर केले पाहिजेत.

हाजी नेणाऱ्या तारवांनीं जात्या सफरींत आदनास लागणें.

२९. आदन खेरीज करून ब्रिटिश हिंदुस्थानांतील कोणत्याही बंदराहून तांबड्या समुद्रामधील कोणत्याही बंदरास जाणाऱ्या हाजी नेणाऱ्या दरेक तारवानें आदन येथें लागलें पाहिजे, आणि तें तारूं शेवटीं ज्या बंदराहून निघालें असेल तें बंदर सोडल्यापासून त्यावर कोणा मनुष्यास पटकीचा वाखा झालेला आहे किंवा झालेला नाहीं अशा मजकुराचा दाखला योग्य अधिकाऱ्याकडून घेतल्यावांचून त्यानें तें बंदर सोडतां कामा नये.

आदन येथील अधिकाऱ्यास तारवाला बंदर सोडण्याची परवानगी देण्यास इनकार करण्याचा केव्हां अखत्यार आहे.

३०. कलम २९ याअन्वयें जरूर असणारा दाखला देण्याचा अखत्यार मिळालेल्या आदन येथील अधिकाऱ्यास, या आक्टाचे किंवा त्याअन्वयें केलेल्या कोणत्याही कानूचे ठराव सदरहू तारवावर पाळण्यांत आले नसले, तर त्या तारवास तें बंदर सोडून जाण्याची परवानगी देण्यास इनकार करण्याचा अखत्यार आहे.

हाजी नेणारें तारूं जात्या सफरीवर जाईल त्या प्रसंगीं खत लिहून देणें.

३१. ब्रिटिश हिंदुस्थानांतील कोणत्याही बंदराहून तांबड्या समुद्रामधील कोणत्याही बंदरास हाजी घेऊन जाणाऱ्या दरेक तारवाच्या बाबतींत, पोर्ट-क्लियरन्स देण्याचें ज्या अमलदाराचें काम असेल त्यानें, त्या तारवाचा मास्तर, मालक किंवा एजंट व

ब्रिटिश हिंदुस्थानांत राहणारे दोन जामीन यांनीं सेक्रेटरी आफ् स्टेट फार इंडिया इन् कौन्सिल यांच्या नांवीं खालीं लिहिलेल्या शर्तींचें पांच हजार रुपयांच्या रकमेचें सामायिक व प्रत्येकाच्या जबाबदारीचें खत लिहून दिल्यावांचून किंवा दिलें जाई तोंपर्यंत पोर्ट-क्लियरन्स देतां कामा नये. सदरहू शर्ती येणेंप्रमाणें:—

(अ) सदरहू तारूं जात्या सफरींत (ही सफर आदन येथें सुरू होत नसल्यास) आदनास लागेल व तेथें २९ व्या कलमावरून जरूर असणारा दाखला घेईल, आणि

(ब) सदरहू तारवाचा मास्तर व असल्यास एक किंवा अधिक वैद्यकीय अमलदार हे, या आक्टाच्या आणि त्याअन्वयें केलेल्या कानूंच्या ठरावांप्रमाणें वागतील.

हाजी तारवावर चढण्यापूर्वीं वैद्यकीय पाहणीची व परवानगीची जरूरी आहे.

३२. (१) ब्रिटिश हिंदुस्थानांतील कोणत्याही बंदरीं किंवा जागीं हाजी नेणाऱ्या कोणत्याही तारवावर कोणत्याही हाजीस, हाजींची वैद्यकीय पाहणी करण्यासाठीं स्थानिक सरकार ठरवील तशा वेळीं व जागीं, आणि तशा रीतीनें त्याची पाहणी केल्यावांचून व करण्यांत येई तोंपर्यंत, व तसेंच ८ व्या कलमाअन्वयें ज्या अमलदारास सूचना दिली असेल त्याकडून हाजींस तारवावर चढविण्याची सुरुवात करण्याविषयीं परवानगी देण्यांत येई तोंपर्यंत, घेतां कामा नये.

(२) जर या कलमाअन्वयें पाहणी करणाऱ्या अमलदारास, कोणा हाजीला पटकीचा वाखा किंवा पटकीच्या स्वरूपाचा विकार किंवा कोणताही भयंकर प्रकारचा सांक्रामिक किंवा स्पर्शजन्य रोग झालेला आहे, किंवा तो झाल्याचीं कांहीं चिन्हें, किंवा अंदेशा येण्यासारखीं इतर कांहीं लक्षणें, त्याजमध्यें दिसत आहेत असें वाटेल, तर अशा हाजीस तारवावर चढण्याची परवानगी देतां कामा नये.

(३) पटकीचा वाखा किंवा पटकीच्या स्वरूपाचा विकार किंवा भयंकर प्रकारचा कोणताही सांक्रामिक किंवा स्पर्शजन्य रोग झालेल्या मनुष्यांच्या संपर्कानें ज्या जिनसा दूषित झाल्या असतील, किंवा ज्या याप्रमाणें दूषित झाल्याविषयीं अंदेशा येत असेल त्या सर्व जिनसा, हाजी नेणाऱ्या तारवावर घेतल्या जाण्यापूर्वीं, स्थानिक सरकारानें त्या कारणासाठीं नेमलेल्या वैद्यकीय अमलदाराच्या देखरेखीखालीं, जी रीत ठरविण्यांत येईल त्या रीतीनें शुद्ध करून रोगबीजाचा नाश केला पाहिजे.

विशेष प्रसंगीं हाजी तारवावर चढल्यानंतर वैद्यकीय पाहणी करणें.

३३. (१) जर कोणत्याही प्रसंगीं हाजी नेणारें तारूं त्यावर सर्व हाजी घेतल्यानंतर अठ्ठेचाळीस तासांच्या आंत आपल्या सफरीवर गेलें नाहीं, व तारवावरील कोणा मनुष्यास पटकीचा वाखा किंवा पटकीच्या स्वरूपाचा विकार किंवा कोणताही भयंकर प्रकारचा सांक्रामिक किंवा स्पर्शजन्य रोग झालेला आहे असा अंदेशा येण्यास कारण असेल, तर स्थानिक सरकार फर्मावील तशा रीतीनें तारवावरील सर्व मनुष्यांची वैद्यकीय पाहणी करण्याचा अधिकार आहे.

(२) जर अशा पाहणीच्या अंतीं कोणा मनुष्यास पटकीचा वाखा किंवा पटकीच्या स्वरूपाचा विकार किंवा कोणताही भयंकर प्रकारचा सांक्रामिक किंवा स्पर्शजन्य रोग झालेला आहे असें आढळून येईल, किंवा तो झाल्याचीं कांहीं चिन्हें, किंवा अंदेशा येण्यासारखीं इतर कांहीं लक्षणें, त्याजमध्यें दिसत असतील, तर त्याला त्याच्या सर्व जिनसांसुद्धा तारवावरून एकदम काढलें पाहिजे.

स्त्रियांची वैद्यकीय पाहणी.

३४. साधेल तेथवर, व या आक्टाअन्वयें ज्या कोणत्याही कानू करण्यांत येतील त्यांस अनुसरून, हाजी स्त्रियांची वैद्यकीय पाहणी स्त्रियांकडून करण्यांत आली पाहिजे.

तिकिटें देणें व हजर करणें आणि नोट परत देणें.

३५. (१) दरेक हाजीस, आपला नोट दिल्यावर व इतर कांहीं शर्ती ठरविलेल्या असल्यास त्या पुऱ्या केल्यावर, ठरविलेल्या नमुन्याप्रमाणें एक तिकीट मिळण्याचा हक

आहे, आणि त्यानें, ठरविण्यांत येतील तशा अमलदारांकडे किंवा तशा प्रसंगीं तें हजर केलें पाहिजे आणि ठरविलेल्या रीतीनें त्याच्या संबंधानें इतर प्रकारें वागलें पाहिजे.

(२) ज्या हाजीस ३२ व्या कलमाअन्वयें तारवावर चढण्याची मनाई केली असेल किंवा ३३ व्या कलमाअन्वयें तारवावरून काढलें असेल किंवा पुढें जाण्याची इतर रीतीनें मनाई केली असेल तशा दरेक हाजीला, त्यानें जो कोणताही नोर दिलेला असेल तो, ठरविण्यांत येतील तशा शर्तींस किंवा बजावाटींस अनुसरून, परत मिळण्याचा हक्क आहे.

आरोग्यरक्षणासंबंधीं कर हाजी नेणाऱ्या तारवाच्या मास्तरानें देणें.

३६. हाजी नेणारें तारूं ज्या ज्या बंदरास लागेल त्या त्या बंदरीं कायदेशीर अधिकाऱ्यानें बसविलेल्या आरोग्यरक्षणासंबंधी करांची सगळी रकम, हाजींस दिलेल्या तिकिटांच्या किंमतींत असे कर सामील केलेले असल्यास व केले असतील तेथवर, अशा दरेक तारवाच्या मास्तरानें दिली पाहिजे.

## शिक्षा.

हाजी नेणारें तारूं गैरकायदेशीर रीतीनें निघण्याबद्दल किंवा त्यानें त्याप्रमाणें हाजी घेण्याबद्दल मास्तरास किंवा मालकास शिक्षा.

३७. (१) जर हाजी नेणारें तारूं कलम ७, पोट-कलम (१), किंवा कलम १०, यांतील ठरावांविरुद्ध ब्रिटिश हिंदुस्थानांतील कोणत्याही बंदराहून किंवा जागेहून सफरीवर निघेल किंवा जाईल, किंवा अशा बंदरीं किंवा जागीं उतारू उतरील, तर त्याचा मास्तर किंवा मालक यास, प्रसंगाप्रमाणें, त्या तारवांतून नेलेल्या किंवा सदरीलप्रमाणें उतरलेल्या दरेक उतारूबद्दल, शंभर रुपयेपर्यंत दंडाची किंवा एक महिनापर्यंतच्या मुदतीच्या कैदेची शिक्षा होईल, किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

(२) जर कलम ७, पोट-कलम (२), यांतील ठरावांविरुद्ध कोणत्याही मनुष्यास हाजी नेणाऱ्या तारवावर हाजीदाखल घेण्यांत येईल, तर मास्तर किंवा मालक हा, अशा दरेक हाजीबद्दल, पोट-कलम (१) यांत सांगितल्याप्रकारच्या शिक्षेस पात्र होईल.

(३) सदरहू दोहोंपैकीं कोणत्याही बाबतींत सदरहू तारूं ब्रिटिश हिंदुस्थानांतील कोणत्याही बंदरीं किंवा जागीं दोन वर्षांच्या आंत आढळेल, तर या आक्टांतील ठरावांअन्वयें, या आक्टाअन्वयें ज्या शिक्षांस त्याचा मास्तर किंवा मालक पात्र झाला असेल त्या शिक्षा ठरविण्यांत येत तोंपर्यंत, व या आक्टाअन्वयें त्यास केलेले दंड, सर्व खर्चासुद्धां, वसूल करण्यांत येत तोंपर्यंत, तें तारूं धरून अटकावून ठेवण्याचा कस्टमच्या कोणत्याही मुख्य अमलदारास अधिकार आहे :

मात्र असें ठरविण्यांत येतें कीं, या कलमाअन्वयें दिलेल्या कैदेच्या शिक्षेची एकंदर मुदत एका वर्षाहून जास्त असतां कामा नये.

हाजी नेणाऱ्या तारवावर जाण्यास किंवा त्याची पाहणी करण्यास हरकत करण्याबद्दल शिक्षा.

३८. जर कोणताही मनुष्य, तारवावर जाण्याविषयीं किंवा त्याची पाहणी करण्याविषयीं या आक्टांत किंवा या आक्टाअन्वयें अधिकार दिल्याप्रमाणें त्यावर जाण्यास किंवा त्याची पाहणी करण्यास अडथळा करील किंवा त्यावर जाऊं देण्याचें किंवा त्याची पाहणी करूं देण्याचें नाकारील, तर त्यास दरेक अपराधाबद्दल पांचशें रुपयेपर्यंत दंडाची शिक्षा होईल, किंवा तीन महिनेपर्यंतच्या मुदतीच्या कैदेची शिक्षा होईल, किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

दाखल्यांची नकल प्रदर्शित न करण्याबद्दल मास्तरास किंवा मालकास शिक्षा.

३९. हाजी नेणाऱ्या तारवाचा मास्तर किंवा मालक दाखल्यांच्या नकला लावून ठेवण्याबाबद १७ व्या कलमांत फर्माविल्याप्रमाणें करण्यास बाजवी सबबीवांचून—अशी सबब शाबीत करण्याचा बोजा त्याजवर राहील—चुकेल, तर त्यास दोनशें रुपयेपर्यंत दंडाची किंवा एक महिनापर्यंतच्या मुदतीच्या कैदेची शिक्षा होईल, किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

हाजींसंबंधीं पत्रकांबाबद फर्माविल्याप्रमाणें न करण्याबद्दल

४०. जर हाजी नेणाऱ्या तारवाचा मास्तर, हाजींसंबंधी पत्रकांबाबद कलम २२, कलम २३ किंवा कलम २९ यांत फर्माविलेल्या गोष्टींपैकीं कोणतीही गोष्ट करण्यास

व दुसऱ्या कित्येक गोष्टींबद्दल मास्तरास शिक्षा.

चुकेल, किंवा अशा कोणत्याही पत्रकांत किंवा पत्रकावर कोणताही खोटा मजकूर किंवा टिपण बुद्ध्या लिहील, किंवा २४ ज्या कलमांत सांगितल्या प्रकारचा कोणताही नवीन दाखला घेण्यास किंवा जादा हाजींच्या संख्येबाबद त्या कलमांत सांगितल्या प्रकारचें कोणतेंही पत्रक करण्यास चुकेल, तर त्यास, अशा दरेक अपराधाबद्दल पांचशें रुपयेपर्यंत दंडाची शिक्षा होईल, किंवा तीन महिनेपर्यंतच्या मुदतीच्या कैदेची शिक्षा होईल, किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

दाखला घेतल्यावर हाजी नेणाऱ्या तारवांवर कपटानें फेरफार करण्याबद्दल मास्तरास शिक्षा.

४१. जर हाजी नेणाऱ्या तारवाचा मास्तर, कलम १० किंवा कलम २४ यांत सांगितलेल्या दाखल्यांपैकीं कोणताही दाखला घेतल्यावर, अशी कांहीं गोष्ट कपटानें करील किंवा करूं देईल कीं तिच्या योगानें तारवाची, तारवावरील हाजींची, किंवा ज्या इतर बाबतींसंबंधीं तो दाखला असेल त्या इतर बाबतींची स्थिति बदलली जाऊन त्या स्थितीस तो दाखला नालागू होईल, तर त्यास दोन हजार रुपयेपर्यंत दंडाची किंवा सहा महिनेपर्यंतच्या मुदतीच्या कैदेची शिक्षा होईल, किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

ठरविलेलें खुराकी सामान हाजींस देण्यास चुकण्याबद्दल मास्तरास शिक्षा.

४२. जर हाजी नेणाऱ्या तारवाचा मास्तर, वाजवी सबबीवांचून—अशी सबब शाबीत करण्याचा बोजा त्याजवर राहील—कोणत्याही हाजीस ठरविलेल्या मोतादीप्रमाणें खुराकी सामान, सर्पण व पाणी देण्याचें वर्जील, तर त्यास, अशा वर्जनामुळें ज्याची नुकसानी झाली असेल तशा दरेक हाजीबद्दल वीस रुपयेपर्यंत दंडाची शिक्षा होईल.

ज्या संख्येपर्यंत हाजी नेण्याचा अधिकार असेल तिच्याहून जास्त हाजी नेण्याबद्दल मास्तरास व मालकास शिक्षा.

४३. (१) हाजी नेणाऱ्या तारवावर असणाऱ्या हाजींची संख्या, या आक्टाअन्वयें हाजींची जी संख्या नेण्याचा अधिकार असेल तिच्याहून, किंवा तें तारूं निघाल्याच्या बंदरीं किंवा जागीं लैसेन्स किंवा दाखला दिलेला असल्यास त्या लैसेन्सावरून किंवा दाखल्यावरून जी संख्या नेण्याचा अधिकार असेल तिच्याहून, ह्मणजे या दोहोंपैकीं जी संख्या लहान असेल तिच्याहून, जास्त असेल, तर मास्तर व मालक यांपैकीं दरेकास, सदरीलप्रमाणें अधिकार असलेल्या संख्येहून जास्त असणाऱ्या दरेक हाजीबद्दल वीस रुपयेपर्यंत दंडाची शिक्षा होईल, आणि असा मास्तर याशिवाय आणखी अशा दरेक हाजीच्या संबंधानें एक आठवडापर्यंतच्या मुदतीच्या कैदेच्या शिक्षेस पात्र होईल: मात्र असें ठरविण्यांत येतें कीं या कलमाअन्वयें दिलेल्या कैदेच्या शिक्षेची एकंदर मुदत सहा महिन्यांहून जास्त असतां कामा नये.

(२) या बाबतींत स्थानिक सरकाराकडून अधिकार मिळालेल्या कोणत्याही अमलदारास, या आक्टाअन्वयें किंवा सदरीं सांगितल्या प्रकारच्या लैसेन्सावरून किंवा दाखल्यावरून अधिकार असलेल्या संख्येहून जास्त असणाऱ्या सर्व हाजींस तारवावरून उतरविण्याचा, आणि ज्या बंदरीं उतरण्याविषयीं त्यांनीं करार केला असेल त्या बंदरास त्यांस रवाना करून त्यांस याप्रमाणें रवाना करण्याचा खर्च त्या तारवाच्या मास्तराकडून किंवा मालकाकडून तो या आक्टाअन्वयें केलेला दंड असल्याप्रमाणें वसूल करण्याचा अखत्यार आहे, आणि त्या अमलदाराच्या सहीचा दाखला सदरहू खर्चाच्या रकमेचा निरुत्तर पुरावा होईल.

हाजीनें ज्या जागीं उतरण्याचा करार केला असेल त्याखेरीज इतर जागीं त्यास उतरण्याबद्दल मास्तरास शिक्षा.

४४. जर हाजी नेणाऱ्या तारवाचा मास्तर, कोणत्याही हाजीस, त्यानें ज्या बंदरीं किंवा जागीं उतरण्याचा करार केला असेल त्याखेरीज इतर कोणत्याही बंदरीं किंवा जागीं, त्याचें पूर्वी अनुमत घेतल्यावांचून किंवा समुद्राच्या धोक्यांमुळें किंवा इतर अनिवार्य अपायामुळें तेथें उतरणें जरूर झाल्यावांचून उतरील, तर त्यास अशा दरेक अपराधाबद्दल दोनशें रुपयेपर्यंत दंडाची शिक्षा होईल, किंवा एक महिनापर्यंतच्या मुदतीच्या कैदेची शिक्षा होईल, किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

हार्जीबरोबर केलेल्या करारा-विरुद्ध सफर करण्याबद्दल मास्त-रास व मालकास शिक्षा.

४५. जर हाजी नेणारें तारूं, त्यानें करावयाच्या सफरीबाबद व त्या सफरीस लागणाऱ्या वेळाबाबद हार्जींबरोबर, प्रसिद्ध जाहिरात देऊन किंवा इतर रीतीनें, केलेला कोणताही स्पष्ट किंवा गर्भित करार किंवा कबुलायत याविरुद्ध, समुद्राच्या धोक्यांच्या किंवा इतर अनिवार्य अपायाच्या कारणाखेरीज दुसऱ्या कोणत्याही सबबीनें, कोणत्याही बंदरीं किंवा जागीं लागेल, तर त्याचा मास्तर व मालक यांपैकीं दरेकास पांचशें रुपयेपर्यंत दंडाची किंवा तीन महिनेपर्यंतच्या मुदतीच्या कैदेची शिक्षा होईल, किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

हाजी नेणारें तारूं मुख्यत्वें-करून वाफेच्या योगानें न चाल-विण्याबद्दल किंवा तें ठरविलेल्या बारदानाचें किंवा वाफेच्या श-क्तीचें नसण्याबद्दल त्याच्या मा-स्तरास व मालकास शिक्षा.

४६. जर हाजी नेणारें तारूं २६ व्या कलमावरून जरूर असल्याप्रमाणें मुख्यत्वें-करून वाफेच्या योगानें चालविलेलें नसेल किंवा ठरविलेल्या बारदानाचें किंवा वाफेच्या शक्तीचें नसेल, तर त्याचा मास्तर व मालक यांपैकीं दरेकास पांचशें रुपयेपर्यंत दंडाची किंवा तीन महिनेपर्यंतच्या मुदतीच्या कैदेची शिक्षा होईल, किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

एका किंवा अधिक वैद्यकीय अमलदारांवाचून किंवा तैनाती-च्या मनुष्यांवांचून २७ व्या क-लमाविरुद्ध हाजी नेणारें तारूं हकारण्याबद्दल त्याच्या मास्तरास शिक्षा.

४७. शंभरांहून जास्त हाजी नेणाऱ्या तारवावर, २७ व्या कलमावरून जरूर असल्याप्रमाणें, एक वैद्यकीय अमलदार नसेल किंवा नेलेल्या हार्जींची संख्या एक हजारांहून जास्त असल्यास दोन वैद्यकीय अमलदार नसतील, व तसेंच ठरविलेलीं तैनातीचीं मनुष्यें नसतील, तर त्याच्या मास्तरास पांचशें रुपयेपर्यंत दंडाची किंवा तीन महिनेपर्यंतच्या मुदतीच्या कैदेची शिक्षा होईल, किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

जात्या सफरींत आदन येथें दाखला न घेण्याबद्दल मास्तरास शिक्षा.

४८. आदन खेरीज करून ब्रिटिश हिंदुस्थानांतील कोणत्याहि बंदराहून तांबड्या समुद्रामधील कोणत्याहि बंदरास जाणाऱ्या हाजी नेणाऱ्या तारवाचा मास्तर, वाजवी सबबीवांचून—अशी सबब शाबीत करण्याचा बोजा त्याजवर राहील—आदनास तारूं लावण्यास चुकेल, किंवा २९ व्या कलमावरून जरूर असणारा दाखला घेतल्यावांचून तें बंदर सोडील, तर त्यास, अशा दरेक अपराधाबदल, दोन हजार रुपयेपर्यंत दंडाची किंवा सहा महिनेपर्यंतच्या मुदतीच्या कैदेची शिक्षा होईल, किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

कलम ३२ किंवा ३३ याविरुद्ध हाजी किंवा जिन्नस तारवावर घेणाऱ्या किंवा ठेवणाऱ्या मास्त-रास शिक्षा.

४९. जर हाजी नेणाऱ्या तारवाचा मास्तर, ३२ व्या कलमाच्या ठरावांविरुद्ध कोणताही हाजी किंवा कोणतीही संपर्कानें दूषित झालेली जिन्नस जाणूनबुजून तारवावर घेईल, किंवा ३३ व्या कलमाअन्वयें तारवावरून काढण्याविषयीं हुकूम झालेला कोणताही हाजी किंवा जिन्नस तारवावर ठेवील, तर त्यास, याप्रमाणें तारवावर घेतलेल्या किंवा ठेवलेल्या दरेक हाजीबद्दल पांचशें रुपयेपर्यंत किंवा अशा दरेक जिनसेबद्दल पन्नास रुपयेपर्यंत दंडाची शिक्षा होईल, किंवा तीन महिनेपर्यंतच्या मुदतीच्या कैदेची शिक्षा होईल, किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

हाजी नेणाऱ्या तारवाचा मास्तर किंवा वैद्यकीय अमलदार यास या आक्टाअन्वयें केलेल्या कानू न पाळण्याबद्दल शिक्षा.

५०. हाजी नेणाऱ्या तारवाचा मास्तर किंवा असल्यास वैद्यकीय अमलदार हा, या आक्टाअन्वयें केलेली कोणतीहि कानू, वाजवी सबबीवांचून—अशी सबब शाबीत करण्याचा बोजा त्याजवर राहील—तोडील, किंवा पाळण्याची वर्जील किंवा हयगय करील, तर त्याला पांचशें रुपयेपर्यंत दंडाची किंवा तीन महिनेपर्यंतच्या मुदतीच्या कैदेची शिक्षा होईल, किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

## काम चालविण्याची रीत.

अपराध ठरविणें, व हाजी नेणारें तारूं जप्त करून दंड वसूल करणें.

५१. (१) या आक्टाविरुद्ध होणाऱ्या अपराधांबद्दल शिक्षा करण्याचा माजिस्ट्रेटास अधिकार आहे.

(२) ज्या मनुष्यास या आक्टाअन्वयें दंड केला असेल तो मनुष्य हाजी नेणाऱ्या तारवाचा मास्तर किंवा मालक असून जर असा दंड, तो देण्याबाबदच्या हुकुमांत ठरविलेल्या वेळीं व रीतीनें देण्यांत आला नाहीं, तर माजिस्ट्रेटास, पैसा वसूल करण्याविषयीं कायद्यांत नेहमीचे जे उपाय सांगितले असतील त्यांखेरीज आणखी, असें हाजी

नेणारें तारूं, त्याचीं दोरखंडें, सामान व शिडें वगैरे, हीं जप्त करून व विकून, देण्याची राहिलेली रकम वसूल करण्याविषयीं वारंटाच्या द्वारें हुकूम फर्माविण्याचा अधिकार आहे.

अधिकार.

९२. या आक्टाअन्वयें सांगितलेल्या शिक्षा ठरविण्याच्या कारणासाठीं, त्याच्या ठरावांविरुद्ध केलेला दरेक अपराध, अपराधी ज्या जागीं मिळाला असेल त्या जागेच्या माजिस्ट्रेटाच्या अधिकाराच्या हद्दींत केला आहे असें मानलें पाहिजे.

शिक्षा होण्याबद्दल काम चालविण्याचा आधार.

९३. हाजी नेणाऱ्या तारवांचे मास्तर व मालक ज्या शिक्षांस या आक्टानें पात्र होतात त्या शिक्षा, या आक्टाअन्वयें दाखले देण्यास नेमलेल्या अमलदारांच्या सांगण्यावरून, किंवा ज्या कोणत्याही बंदरीं किंवा जागीं सदरहू प्रकारचा अमलदार नसेल तेथें कस्टमच्या मुख्य अमलदाराच्या सांगण्यावरून फिर्याद झाली असतां मात्र अमलांत आणल्या पाहिजेत.

दंडाचा विनियोग.

९४. या आक्टाअन्वयें दंड करणाऱ्या माजिस्ट्रेटास, त्याला योग्य वाटेल तर तो सर्व दंड किंवा त्याचा कोणताही भाग, ज्या कृत्याबाबद किंवा कसुरीबाबद हा दंड केला असेल त्या कृत्यामुळें किंवा कसुरीमुळें कोणत्याही मनुष्याची झालेली कोणतीही नुकसानी भरून देण्यामध्यें किंवा भरून देण्याकडे किंवा फिर्यादीतर्फेचा खर्च देण्यामध्यें किंवा देण्याकडे, किंवा ज्या कोणत्याही मनुष्याच्या बातमीवरून अपराधाची शाबिती झाली असेल किंवा जो अपराध्याचा पत्ता लावण्याच्या किंवा त्यावर फिर्याद करण्याच्या कामीं इतर रीतीनें कारणीभूत झाला असेल त्याला बक्षीस देण्यामध्यें लावण्याविषयीं फर्माविण्याचा अधिकार आहे.

गैरहजर साक्षीदारांच्या जबान्या.

९५. (१) या आक्टाअन्वयें कोणतेंही कायद्यासंबंधीं काम चालत असतांना त्या कामाच्या विषयासंबंधीं एकाद्या साक्षीदाराची साक्ष पाहिजे लागेल तेव्हां, त्याच विषयासंबंधीं त्यानें, मलिका माआझमांच्या राज्यांतील (जेथें सदरहू काम चालले असेल तें बंदर किंवा जागा ज्या स्थानिक सरकाराच्या ताब्यांत असेल त्या स्थानिक सरकारच्या ताब्यांत असणाऱ्या भागांखेरीज हिंदुस्थानचे इतर सर्व भाग धरून) कोणत्याही जस्टिसपुढें किंवा माजिस्ट्रेटपुढें, किंवा इतर ठिकाणीं कोणत्याही ब्रिटिश कान्सुलर आफिसरापुढें, पूर्वी जी कोणतीही जबानी दिली असेल ती, सदरहू काम ज्या कोर्टांत चाललें असेल त्या कोर्टाच्या अधिकाराच्या हद्दीच्या आंत सदरहू साक्षीदार मिळूं शकत नाहीं असें शाबीत करण्यांत आलें असतां, पुराव्यास घेतां येईल:

मात्र असें ठरविण्यांत येतें कीं सदरहू जबानी—

(अ) तिजवर सदरहू जस्टिसची, माजिस्ट्रेटाची किंवा कान्सुलर आफिसराची सही असल्यावांचून;

(ब) ती आरोपी मनुष्यासमक्ष झालेली असल्यावांचून; आणि

(क) ती याप्रमाणें झाली आहे असा दाखला सदरहू जस्टिसानें, माजिस्ट्रेटानें किंवा कान्सुलर आफिसरानें दिलेला असल्यावांचून;

पुराव्यास घेतां येणार नाहीं.

(२) सदरहू प्रकारच्या कोणत्याही जबानीवर ज्या मनुष्यानें सही केलेली दिसत असेल, त्याची सही किंवा हुद्दा कोणत्याही प्रसंगीं शाबीत करणें जरूर नाहीं; आणि कोणत्याही फौजदारी कामांत सदरीं सांगितलेला दाखला हा, उलट शाबिती करण्यांत आली नाहीं तर, त्या दाखल्यांत लिहिल्याप्रमाणें आरोपी हजर असल्याविषयीं पुरता पुरावा आहे असें समजावें.

## पुरवणी ठराव.

हाजी तारवावर चढल्याच्या व ते तारवावरून उतरण्याच्या बंदरांस माहिती पाठविणें.

९६. (१) हाजी नेणारें तारूं ब्रिटिश हिंदुस्थानांतील ज्या कोणत्याही बंदरीं किंवा जागीं लागेल किंवा येईल त्या बंदरांतील किंवा जागेंतील कस्टमच्या मुख्य अमलदारानें,

किंवा त्या ठिकाणीं त्या कामासाठीं स्थानिक सरकारानें दुसरा अमलदार नेमलेला असल्यास त्यानें, अशा हाजी नेणाऱ्या तारवाविषयीं व त्यांतील हाजींविषयीं त्यास महत्त्वाचा वाटेल तसा कोणताही तपशील, ज्या बंदराहून किंवा जागेहून त्या तारवानें आपली सफर सुरू केली असेल त्या बंदरांतील किंवा जागेंतील अमलदारास, आणि ब्रिटिश हिंदुस्थानांतील ज्या दुसऱ्या कोणत्याही बंदरीं किंवा जागीं सदरील हाजी किंवा त्यांपैकीं कोणतेही हाजी त्या तारवावर चढले असतील किंवा त्यावरून उतरावयाचे असतील त्या बंदरांतील किंवा जागेंतील अमलदारास, या आक्टाच्या ठरावांकडे लक्ष पुरवून, पाठविला पाहिजे.

(२) हाजी नेणारें तारूं ब्रिटिश हिंदुस्थानांतील ज्या कोणत्याही बंदरीं किंवा जागीं लागेल किंवा येईल त्या बंदरांतील किंवा जागेंतील कस्टमच्या मुख्य अमलदाराला, किंवा त्या ठिकाणीं त्या कामासाठीं स्थानिक सरकारानें दुसरा अमलदार नेमलेला असल्यास त्याला, हाजींच्या संख्येबाबदच्या व इतर गोष्टींबाबदच्या या आक्टांतील ठरावांप्रमाणें वहिवाट झाली आहे किंवा कसें हें समजण्यासाठीं त्या तारवावर जाऊन त्याची पाहणी करण्याचा अधिकार आहे.

९७. ज्या कोणत्याही शिक्षेस या आक्टाअन्वयें कोणी पात्र झाला असेल ती ठरविण्यासाठीं चाललेल्या कोणत्याही कामांत, सदरील शेवटच्या कलमाचें पोटकलम (१) यामध्यें सांगितल्या प्रकारच्या तपशिलाचा रिपोर्ट ह्मणून असणारा कोणताही दस्तऐवज, किंवा इन्साफाच्या कोणत्याही कोर्टांत चाललेल्या कामाची योग्य रीतीनें सही केलेली नकल, आणि तसेंच परमुलुखाच्या कोणत्याही बंदरांत मलिका याआझमांच्या वतीनें कान्सलचा अधिकार कायदेशीर रीतीनें चालविणाऱ्या कोणत्याही मनुष्यानें करून सही केलेला ह्मणून असणारा तशाच प्रकारचा कोणताही दस्तऐवज, हे कागद, या आक्टाखालील सदरहू काम ज्या जागीं चाललें असेल त्या जागेंतील किंवा त्या जागेजवळील कोणत्याही अमलदाराकडे ते सरकारी नात्यानें पाठविण्यांत आले आहेत असें दिसून येईल, त्यास घेतले पाहिजेत. कान्सलचा रिपोर्ट.

९८. (१) गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांस, खालीं लिहिलेल्या सर्व किंवा कोणत्याही गोष्टींबाबद नियमन करण्यासाठीं या आक्टास अनुसरून असणाऱ्या कानू करण्याचा अधिकार आहे. त्या गोष्टी येणेंप्रमाणें:— गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल व स्थानिक सरकार यांस कानू करण्याचा अधिकार.

(अ) हाजी नेणाऱ्या तारवांवर बोटी, नांगर, सांखळा किंवा दोर द्यावयाचे ते;

(ब) नौका चालविण्याच्या कारणांसाठीं ज्या यंत्रांचा पुरवठा करावयाचा तीं;

(क) तारवावर आग लागली असतां ती विझविण्यासाठीं लागणारी सामग्री व त्यावर आग लागूं नये यासाठीं व ती लागली असतां तिच्या संबंधानें जें कर्तव्य तें करण्यासाठीं, पूर्वीं करून ठेवावयाच्या तजविजी;

(ड) जीव बचावण्याबद्दलच्या व संकटाबाबद निशाण्या करण्याबद्दलच्या साधनांची तजवीज, आणि पाण्यांत न बिझणाऱ्या व लाइफबोय यांस लावून ठेवण्याची सोय केलेल्या दिव्यांचा पुरवठा;

(इ) हाजींच्या सुखाकरितां व सोईकरितां वरच्या व मधल्या डेकांवर करावयाच्या सोई [फिटिंग्स] व इतर साधनें;

(फ) हाजींस ज्या मानानें व ज्या रीतीनें खुराकी सामान, सर्पण व पाणी पुरवावयाचें तें मान व ती रीत, आणि त्या खुराकी सामानाची, सर्पणाची व पाण्याची प्रत;

(ग) न्यावयाच्या मालाची प्रत, परिमाण व तो भरून ठेवणें;

(इ) वरच्या डेकची जागा निरनिराळ्या वर्गांच्या हाजींमध्यें वांटून देणें;

(आय्) हाजींच्या सामानाचें परिमाण व व्यवस्था;

(ज) आरोग्य, स्वच्छता व लज्जा राखण्यासाठीं इसपितळाची व औषधसंग्रहाची, रोगबीजनाशक पदार्थांची व इतर साधनांची व सोईची तारवावर तजवीज करावयाची त्यांचा प्रकार व यत्ता;

(के) कलमें २२ व २९ यांअन्वयें मास्तरानें करून द्यावयाच्या पत्रकांचा नमुना व त्यांमध्यें दाखल करावयाचा तपशील;

(ल) हाजी नेणाऱ्या तारवांच्या बावतींत जरूर असणारें बारदान व वाफेची शक्ति, आणि ज्या सफरींस व ज्या मोसमांस अशा कानू लागू होतील त्या सफरी व ते मोसम;

(म) या आक्टाअन्वयें ज्या बावतींत वैद्यकीय अमलदार व इतर तैनातीचीं मनुष्यें नेणें जरूर आहे त्या बावतींत त्यांस लैसेन्स देणें व नेमणें, आणि अशा वैद्यकीय अमलदारांनीं ठेवावयाचे किंवा सादर करावयाचे रोजनामे, रिपोर्ट व इतर तक्ते;

(न) संपर्कानें दूषित झालेल्या जिनसा हाजी नेणाऱ्या तारवावर घेण्यापूर्वीं त्या ज्या रीतीनें शुद्ध करून रोगबीजाचा नाश करावयाचा ती रीत;

(ओ) स्त्रियांची वैद्यकीय पाहणी ज्या रीतीनें व ज्या मनुष्यांकडून व्हावयाची ती रीत व तीं मनुष्यें;

(प) जाऊं इच्छिणाऱ्या हाजींस द्यावयाच्या तिकिटांचा पुरवठा, अशा तिकिटांचा नमुना व त्यांवर नमूद करावयाच्या शर्ती व इतर गोष्टी, आणि त्यांच्या किमतींत सामील करावयाची आरोग्यरक्षणसंबंधी करांची रकम;

(फ) जाऊं इच्छिणाऱ्या ज्या हाजींस कलमें ३२ व ३३ यांत दिलेल्या अधिकारांअन्वयें तारवावर चढण्याची परवानगी दिलेली नसेल किंवा जे तारवावर चढलेले असून त्यांस त्यावरून काढलें असेल किंवा ज्यांस इतर रीतीनें कोणत्याही अनिवार्य कारणाकरितां कोणत्याही हाजी नेणाऱ्या तारवांतून जातां येत नसेल त्याला नोर परत देणें;

(र) सफरीमध्यें मास्तराचीं, एक किंवा अधिक वैद्यकीय अमलदार असल्यास त्याचीं किंवा त्यांचीं आणि इतर अमलदारांचीं कामें; आणि

(स) साधारणतः, या आक्टाचे हेतु सिद्धीस नेणें.

(२) स्थानिक सरकारास, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांची अगोदर मंजुरी घेऊन, खालीं लिहिलेल्या गोष्टींबाबद नियमन करण्यासाठीं या आक्टास अनुसरून असणाऱ्या कानू करण्याचा अधिकार आहे. त्या गोष्टी येणेंप्रमाणें:—

(अ) हाजी तारवावर चढविण्यासाठीं किंवा त्यावरून उतरण्यासाठीं या आक्टाअन्वयें नेमलेल्या कोणत्याही बंदरीं किंवा जागीं, कोणत्या स्थलसीमेच्या आंत, आणि कोणत्या वेळीं व कोणत्या रीतीनें हाजी तारवावर चढवावयाचे किंवा त्यावरून उतरावयाचे तें; आणि

(ब) हाजी नेणाऱ्या तारवावर हाजी घेण्यास सुरुवात केल्यानंतर त्या तारवानें किती वेळाच्या आंत आपल्या सफरीवर निघालें पाहिजे किंवा गेलें पाहिजे तें.

(३) या कलमाअन्वयें कोणतीही कानू करतांना, ती करणाऱ्या अधिकाऱ्यास, तिचें उल्लंघन केल्याबद्दल दोनशें रुपयेपर्यंत दंडाची शिक्षा होईल असें, आणि अस उल्लंघन एकसारखें चालू राहील तेव्हां पहिल्या दिवसानंतर तें चालू असेल तशा दरेक दिवसाबद्दल आणखी वीस रुपयेपर्यंत दंडाची शिक्षा होईल असें फर्माविण्याचा अधिकार आहे.

(४) या कलमाअन्वयें कानू करण्याचा अधिकार दिला आहे तो, त्या कानू अगोदर प्रसिद्ध करून मग ठरवावयाच्या अशा अटीनें दिला आहे असें समजावें.

९९. सन १८८७चा देशी उतारू नेणाऱ्या तारवांबाबद आक्ट याअन्वयें आजपर्यंत केलेल्या कानू या आक्टाअन्वयें केलेल्या कानूंवरून रद्द करण्यांत किंवा बदलण्यांत आल्याखेरीज व येत तोंपर्यंत त्या सर्व, या आक्टास अनुसरून असतील तेथवर, हाजी नेणाऱ्या तारवांस लागू राहतील. हल्लीं असणाऱ्या कानू तूर्त चालू राहणें.

६०. या आक्टांत दिलेले किंवा त्याअन्वयें देण्यांत येतील ते अधिकार चालविण्यासाठीं, आणि या आक्टांत सोंपलेलीं किंवा त्याअन्वयें सोंपण्यांत येतील तीं कामें करण्यासाठीं, स्थानिक सरकारानें आपणास योग्य वाटतील त्या मनुष्यांस नेमलें पाहिजे. अमलदारांची नेमणूक.

(True Translation)

M. A. BAIG,
Oriental Translator to Government.



BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS

# रेव्हिन्यू डिपार्टमेंट.

मुक्काम जंजिरे मुंबई, तारीख ९ माहे फेब्रुवारी सन १८९६.

नंबर ११११.—हिंदुस्थान सरकारचा खालीं दिलेला जाहिरनामा पुनः प्रसिद्ध केला असे :—

"फिनान्स अॅण्ड कामर्स डिपार्टमेंट.

मुक्काम कलकत्ता, तारीख ३१ माहे जानेवारी सन १८९६.

सेपरेट रेव्हिन्यू.

स्टांप.

नान्-जुडिशियल.

माफ व कमी करणें वगैरे.

नंबर ९२८–एस्. आर. ज्याअर्थी, सक्कर म्युनिसिपालिटीस १,००,००० रुपयांची रकम कर्जी काढण्याचा अधिकार मिळालेला असून ती रकम खालीं सांगितलेले डिबेंचर, ह्मणजे—

| | रु० |
|---|---|
| प्रत्येकीं रुपये ५०० प्रमाणें तारीख २६ माहे एप्रिल सन १८९६ चे नंबर १ ते २०० ... ... | १, ००, ००० |

हे काढून उभी करावयाची आहे व तिजवर पडणाऱ्या स्टांप ड्युटीबद्दल उक्ती रकम ह्मणून ९०० रुपये सदरहू म्युनिसिपालिटीनें, फिनान्स अॅण्ड कामर्स डिपार्टमेंटांतील ठराव नंबर ३६४६*, तारीख १३ माहे नव्हेंबर सन १८८०, याच्या अटींअन्वयें सरकारी तिजोरींत भरले आहेत, त्याअर्थीं हिंदुस्थानचा स्टांप आक्ट नामक सन १८७९ चा १ ला याच्या ८ व्या कलमांत दिलेला अधिकार चालवून आली जनाब गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांनीं, सदरहू डिबेंचरांवर एऱ्हवीं जी कोणतीही स्टांप ड्यूटी पडती, मग ती ते काढतेवेळीं असो, नवीन करून देतेवेळीं असो, एकाऐवजीं अनेक करतेवेळीं असो किंवा अनेकांऐवजीं एक सबंध करतेवेळीं असो, ती माफ केली आहे.

* तारीख १८ माहे नव्हेंबर सन १८८० चें मुंबई सरकारी गॅझेट, भाग १, याच्या ९४५ व्या पृष्ठावर पुनः प्रसिद्ध केला आहे.

(सही) जे. एफ्. फिन्ले,
सेक्रेटरी निसबत हिंदुस्थान सरकार."

आलीजा नेक नामदार गव्हर्नरसाहेब बहादुर
इन् कौन्सिल यांच्या हुकुमावरून,

जे. माण्टीथ,
आक्टिंग सेक्रेटरी निसबत सरकार.

(True Translation)
M. A. BAIG,
Oriental Translator to Government.



BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.